# नोंदणी रद्द झालेल्या संस्थेशी कुडाळ नगरपंचायतीने केला करार

## भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण प्रकरण

**कुडाळ (प्रतिनिधी):**

कुडाळ नगरपंचायतीने कुडाळ शहरांमध्ये राबविलेल्या भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरण मोहिमेत मोठा घोळ असून ही मोहीम राबवण्यासाठी ठेका दिलेल्या कराड येथील व्हेट्स फॉर ॲनिमल या संस्थेची नोंदणी २ मे २०१९ मध्ये सातारा येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या आदेशाने रद्द करण्यात आलेली आहे. नोंदणी रद्द झालेल्या या संस्थेची कागदपत्र पडताळणी न करता कुडाळ नगरपंचायतीने १ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांच्यासोबत या मोहिमेसाठी करार केला आहे. कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून लाखो रुपये लाटण्याचा प्रयत्न सत्ताधारी व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी करून कुडाळवासियांची फसवणूक केली असल्याचा आरोप भाजपा गटनेता विलास कुडाळकर यांनी प्रसिद्धीपत्रकारद्वारे केला आहे. या संस्थेसह या प्रक्रियेत करार करणाऱ्या सर्व अधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी वरिष्ठ स्तरावर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



कुडाळ नगरपंचायतीने कुडाळ शहरातील भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरण मोहिमेची सुरुवात २६ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर २०२२ या १७ दिवसांच्या कालावधीत करण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणावर घोळ असल्याबाबत जिल्हा प्रशासनासह स्थानिक प्रशासनाला निवेदनाद्वारे सांगण्यात आले होते. मात्र यावर कोणत्याही प्रशासनाने कारवाई केली नाही. ५०० कुत्र्यांवर केलेली शस्त्रक्रिया ही बोगस असल्याचेही सांगून त्याची चौकशी सुद्धा केली नाही. तसेच या संस्थेबाबत संशय निर्माण केला होता. त्याची खातरजमा सुद्धा नगरपंचायत प्रशासनाने केली नाही. मुळात सत्ताधाऱ्यांना या मोहिमेतून लाखो रुपये लाटायचे होते. या मोहिमेसाठी नगरपंचायतीच्या स्वनिधी मधून खर्च केला जाणार होता. ९ लाख ४५ हजार रूपये एवढे बिल या मोहिमेसाठी दिले जाणार होते. मात्र तक्रारी अर्ज केल्यानंतर हे बिल थांबविण्यात आले. मात्र त्यावर कोणतीही कारवाई त्यानंतर करण्यात आलेली नाही.

**रद्द झालेल्या संस्थेची करार कसा केला?**

कराड येथील या संस्थेची नोंदणी २०१९ मध्ये रद्द करण्यात आली. या रद्द झालेल्या संस्थेला कुडाळ नगरपंचायतीने ठेका दिला मुळात या संस्थेची कागदपत्रांची कोणत्याही प्रकारे खातरजमा किंवा पडताळणी करण्यात आली नाही. शासनाच्या नियमानुसार धर्मादाय आयुक्त येथे नोंदणीकृत झालेल्या संस्थेला ठेका किंवा काम द्यायचं असेल तर त्या संस्थेच्या मागील तीन वर्षांचा हिशोब झाल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच संस्था कशासाठी नोंदणीकृत झाली आहे हे सुद्धा पाहणे महत्त्वाचे आहे मात्र कुडाळ नगरपंचायतीच्या प्रशासनाने आणि सत्ताधाऱ्यांनी याची कोणतीही पडताळणी न करता या मोहिमेतून लाखो रुपये कसे मिळवता येतील याकडे पाहून हा करार केला.

**करारावर सह्या करणाऱ्यांवर सुद्धा झाली पाहिजे कारवाई**

मुळात प्रशासनाने याची खातरजमा करणे आवश्यक होते मात्र त्याबाबत कोणतीही खातरजमा न करता हा ठेका कराड येथील व्हेट्स फॉर ॲनिमल्सला देण्यात आला. ज्या व्यक्तीसोबत करार करण्यात आला आहे ती व्यक्ती या संस्थेच्या कोणत्याही पदावर कार्यरत नाही. या संस्थेने त्यांना प्राधिकृत केल्याचा कोणताही पुरावा किंवा त्या संदर्भातील ठराव नगरपंचायतीच्या कागदपत्रांमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे या सगळ्या प्रक्रियेमध्ये कागदपत्रांचा घोळ आणि नगरपंचायतीची फसवणूक करण्यात आली आहे. त्यामुळे अशा फसवणूक करणाऱ्या संस्थेसह कुडाळ नगरपंचायतीच्या स्थायी समितीमधील सदस्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी. कारण त्यांनी या करारावर सह्या केल्या आहे, अशी मागणी वरिष्ठस्तरावर केली जाणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात भाजपा गटनेता विलास कुडाळकर यांनी म्हटले आहे.

# केंद्राच्या योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचवा



लाभार्थी संमेलन कार्यक्रमांत बोलताना निर्मल सुराना, सोबत राजन तेली, एकनाथ नाडकर्णी, चेतन चव्हाण, प्रभाकर सावंत, सुधीर दळवी व अन्य. (छाया- सुहास देसाई).

## लाभार्थी संमेलन उत्साहात

**दोडामार्ग (प्रतिनिधी):**

सावंतवाडी विधानसभा लाभार्थी संमेलन नुकतेच सुशीलाबाई हॉल दोडामार्ग येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याने लाभार्थी संमेलन (मेळावा) आयोजित केलेला होता. सदर मेळाव्यास मार्गदर्शक म्हणून निर्मल सुराणा, निरीक्षक, प्रदेश उपाध्यक्ष कर्नाटक राज्य, राजन तेली जिल्हाध्यक्ष भाजप सिंधुदुर्ग, प्रभाकर सावंत, जिल्हा संघटन महामंत्री, बाळू देसाई जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ नाडकर्णी माजी जिल्हा उपाध्यक्ष राजेद्र म्हापसेकर उद्योजक विवेकानंद नाईक तालुका अध्यक्ष सुधीर दळवी, रमेश दळवी दोडामार्ग नगराध्यक्ष चेतन चव्हाण, चंदू मळीक अन्य मान्यवर उपस्थित होते. प्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यांनंतर दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. त्यावेळी अनेकांनी मार्गदर्शन करताना नऊ वर्षे मोदी सरकारमार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. त्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत मांडले. यावेळी राजेद्र म्हापसेकर, चेतन चव्हाण, राजन तेली आदींनी मार्गदर्शन केले यावेळी मोठ्या संख्येने कार्यकते सरपंच, पदाधिकारी भाजपा उपस्थित होते.

# राष्ट्रीय आमदार संमेलन लोकशाहीला समृद्ध करणारे : राज्यपाल बैस

**मुंबई :**

देशात पहिल्यांदाच सर्व आमदार एकाच ठिकाणी एकत्र आले आहेत. राष्ट्रीय विधायक संमेलनाच्या आयोजनामुळे ही संधी उपलब्ध झाली आहे. अशा प्रकारच्या संमेलनांच्या आयोजनांमुळे देशात लोकशाही समृद्ध व सक्षम होईल.त्यामुळे हे संमेलन निश्चितच लोकशाहीला समृद्ध करणारे ठरले आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स मधील जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथील जास्मिन सभागृहात 'राष्ट्रीय विधायक संमेलन भारत 2023' चे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचा समारोपीय कार्यक्रम




पार पडला.

कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, कर्नाटक विधानसभा अध्यक्ष यु. टी खादर, लोकसभेचे माजी अध्यक्ष मीरा कुमार, शिवराज पाटील तसेच विश्वनाथ कराड, सी.पी जोशी, सेलम, सतीश महाना आदी उपस्थित होते.

कायदे मंडळाच्या कार्यवाहीत डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची आवश्यकता असल्याचे सांगत राज्यपाल बैस म्हणाले, की कायदे मंडळाचे कामकाज पेपरलेस झाले पाहिजे. सध्या बऱ्याच विधानसभांमध्ये अर्थसंकल्पीय कामकाज पेपरलेस झाले आहे. देशात नवीन निवडून आलेल्या विधायकाला किमान तीन महिने प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यामुळे कायदे मंडळाची संपूर्ण कार्यवाही त्याला माहिती होईल.

विधानसभांमध्ये पारित होणारे विधेयके, कायदे यामुळे समाजावर दूरगामी परिणाम होतात. त्यामुळे विधेयक विधानसभेत विस्तृत चर्चा करूनच पारित झाले पाहिजे. तसेच विधानसभांच्या कामकाजांचे दिवसही निश्चित असावेत.

दरम्यान, पुढील आयोजन गोवा राज्यात होणार असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना राजदंड देण्यात आला. तिसऱ्या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी कर्नाटक राज्याने घेतल्यामुळे कर्नाटक विधानसभेचे अध्यक्ष यु. टी खादर यांचा सत्कारही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहीचा घंटानाद करण्यात येवून दीप प्रज्वलन करण्यात आले.

आभार प्रदर्शन राहुल कराड यांनी केले. कार्यक्रमाला विविध विधानसभांचे अध्यक्ष, सभापती, उपसभापती, उपाध्यक्ष व देशातून आलेले विधायक उपस्थित होते.

# सांगलीमधील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याच्या हत्येचा पोलिसांकडून २४ तासात उलगडा

## जेलमध्ये असलेल्या 'मोक्का'तील आरोपीनेच रचला कट!

**सांगली :**

सांगलीमधील राष्ट्रवादीचा कार्यकर्ता नालसाब मुल्लाच्या हत्येचा उलगडा करण्यात सांगली पोलिसांना अवघ्या २४ तासात यश आलं आहे. या खुनातील चार आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी अल्पवयीन आहे. या खुनात आणखी आरोपी वाढण्याची शक्यता आहे. २०१९ साली लागलेल्या मोक्का कारवाईतील सचिन डोंगरे या जेलमधील गुन्हेगाराला जामीन न होऊ देण्यासाठी आणि त्याला बाहेर येता येऊ नये यासाठी नालसाब मुल्ला प्रयत्न करत असल्याच्या कारणातून आणि सचिन डोंगरेच्या सांगण्यावरून हत्या केल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. सनी सुनील कुरणे (वय २३, रा. जयसिंगपुर ता. शिरोळ जि. कोल्हापुर), विशाल सुरेश कोळपे (वय २०, रा.लिंबेवाडी ता. कवठेमहांकाळ जि. सांगली) आणि स्वप्नील संतोष मलमे (वय २०, रा. खरशिंग ता. कवठेमहांकाळ जि. सांगली) अशी तीन आरोपीची नावे आहेत. या घटनेची फिर्याद यासिन इस्माईल नदाफ यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात दिली होती.

पोलिसांनी २४ तासांमध्ये या गुन्ह्याचा छडा लावला असून या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे, अशी माहिती सांगलीचे पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी पत्रकार परिषदेत दिली. चौघा आरोपींनी शुक्रवारी नालसाब राहत असलेल्या ठिकाणची रेकी केली होती. तसेच मुल्लाच्या हालचालीची माहिती घेतली होती.

पान १ वरून

## भारत २०२५ पर्यंत टीबीमुक्त करणार!

जात आहे आणि तिथे मी अनेक कार्यक्रमांमध्ये व्यस्त असेल. त्यामुळे मी दौऱ्यावर जाण्याआधी तुमच्याशी संवाद साधावा असा विचार केला आणि याहून चांगले काय असू शकते.'

**बिपरजॉय चक्रीवादळाचा उल्लेख**

बिपरजॉय चक्रीवादळाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी म्हटलं की, 'दोन ते तीन दिवसांपूर्वी देशाच्या पश्चिम भागामध्ये खूप मोठं चक्रीवादळ आलं होतं. गुजरातच्या कच्छ भागामध्ये बिपरजॉय चक्रिवादळामुळे खूप नुकसान झाले. परंतु कच्छच्या लोकांनी ज्या धैर्याने आणि सतर्कतेने या चक्रिवादाळाशी लढा दिलादिला तो तितकाच अभूतपूर्व आहे.'

'एकेकाळी दोन दशकांपूर्वी झालेल्या भूकंपानंतर कच्छ कधीही सावरणार नाही असे म्हटले जात होते. परंतु आज हाच जिल्हा देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक आहे. मला खात्री आहे की कच्छचे लोक बिपरजॉय चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानातून लवकर सावरतील', असं देखील पंतप्रधानांनी म्हटलं.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात ९ वर्षात मोठी विकासात्मक क्रांती

सुरूच राहिला. असे प्रतिपादन भाजप नेते तथा माजी आमदार कर्नाटक निर्मल सुराना यांनी मालवण येथे बोलताना व्यक्त केले.

मोदी @ 9 अभियान अंतर्गत मालवण येथे व्यापारी संमेलन हॉटेल चिवला येथे संपन्न झाले. मागील ९ वर्ष कार्यकाळात राबवलेल्या विविध योजना, विकासात्मक कामे यांची माहिती यावेळी देण्यात आली.

या व्यापारी संमेलनाला भाजप नेते माजी आमदार कर्नाटक निर्मल सुराना यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासह भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य दता सामंत, जिल्हाध्यक्ष राजन तेली, जेष्ठ भाजप पदाधिकारी विलास हडकर, जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, जिल्हा सरचिटणीस अशोक सावंत, तालुकाध्यक्ष धोंडी चिंदरकर, यासह जिल्हा बँक संचालक बाबा परब, माजी नगराध्यक्ष सुदेश आचरेकर, शहर प्रभारी विजय केनवडेकर,दादा साईल, बंड्या सावंत , दीपक पाटकर, गणेश कुशे, खरेदी विक्री संघ अध्यक्ष राजन गांवकर, ललित चव्हाण यासह अन्य पदाधिकारी तसेच व्यापारी बांधव उपस्थित होते.

देशात अनेक योजना आहेत मात्र त्याची अंमलबजावणी करताना अधिकारी वर्गाने अधिक तत्परता दाखवणे गरजेचे आहे. आम्ही कर भरतो, जीएसटी भरतो मग त्या तुलनेत तत्पर सेवा मिळावी यासाठी अधिकाधिक सेवासुविधा आवश्यक आहे. असे मत मालवण येथील व्यापारी नितीन तायशेट्ये यांनी व्यक्त केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वर्षभर काजू मिळत नाहीत. जिल्ह्यात स्टोअर कॅपिसिटी होणे आवश्यक आहे. असे झाल्यास येथील काजू उद्योग काजू फॅक्टरी यांना फायदा होईल,असे मत महान येथील युवा उद्योजक संग्राम सुधीर साळसकर यांनी व्यक्त केले. नारळ या पिकाला साठवून ठेवण्यासाठी तसेच बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न व्हावेत. असे मत नंदू देसाई यांनी व्यक्त केली.

देशात व्यापार वाढला आहे. उद्योगांना व्यवसायिकाना कर्ज पुरवठा होत आहे. ९ वर्षात मोठी क्रांती झाली आहे. आधी अनेक वस्तू आयात होत होत्या. आता भारतात सर्व गोष्टी तयार होतात. आपली निर्यात वाढली आहे. मोदी यांच्या कार्यकाळात अनेक भूमिपूजन झाली आणि त्यांनी त्यांचे उद्घाटन केले. गरीब कल्याण, उद्योग व्यापार, विद्यार्थी विकास, परदेशात भारताचा सन्मान वाढला आहे. ९ वर्षात देश बदलला आहे. असे माजी आमदार सुराना म्हणाले.

आपले पंतप्रधान जगभर फिरतात तेव्हा मोठा सन्मान सर्वत्र मिळत आहे. जागतिक स्तरावर भारताचे स्थान मजबूत झाले आहे. दहशतवादी यांना मागे हटवून भारतीय सैन्याने आक्रमण केले, यश मिळवले. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले.

आज मोबाईल क्षेत्रात भारत जागतिक स्तरावर दोन नंबरवर आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रातही भारत ३ नंबरवर आहे. ९ वर्षात देशात मोठी क्रांती. जे काम हातात घेतात ते पूर्ण करतात. हे चित्र सर्वत्र आहे. देशातील सर्व नागरिक समान आहेत. जम्मू काश्मीर ११४ विधानसभा जागांपैकी ९० जागांसाठी मतदान २४ जागा पाक व्याप्त काश्मीर. तसेच अनेक वेगळे कायदे लागू तेथे होते. मात्र ३७० कलम हटवले. अनेक क्रांतिकारक निर्णय झाले. असे श्री. सुराना यांनी सांगितले.

**पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करूया : दत्ता सामंत**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर ज्यांनी देश चालवला त्या तुलनेत गेल्या वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश जागतिक स्तरावर उंचीवर नेऊन ठेवला आहे. देशासाठी सेवक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काम करत आहेत. २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी यांचे हात अधिक बळकट करूया. असे आवाहन भाजप प्रदेश सदस्य दत्ता सामंत यांनी केले.

**हे विकासाचे पर्व : राजन तेली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या ९ वर्षात भारताने मोठी प्रगती केली. जागतिक स्तरावर भारताचा सन्मान वाढला. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा काजू क्षेत्रात गोडावून वाढवून येथील उद्योगांना अधिक सक्षम केले जातील. देश व राज्य मिळून सर्व स्तरातील जनतेला न्याय देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. आपण सर्वांनी सहभागी होऊया. हे विकासाचे पर्व आहे, असे भाजप जिल्हाध्यक्ष राजन तेली यांनी सांगितले. मालवण हे पूर्वी मोठे बंदर होते. जलमार्ग वाहतूक सुरू होती. ती पुन्हा सुरू व्हावी. याबाबत भूमिका गणेश कुशे यांनी मांडली.

प्रास्ताविक करताना विजय केनवडेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याची माहिती देताना केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या एमएसइमी मंत्रालय मार्फत सुरू असलेल्या सर्व योजनांचीही माहिती दिली. जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या ९ वर्षातील कार्यकाळात राबवलेल्या योजना, विकास याबाबत स्लाईड शो माध्यमातून माहिती दिली.

**उद्योग सन्मान पुरस्कार**

व्यापारी पंडित देउलकर (मसाला व्यापारी) नितीन तायशेट्ये (बेकरी उद्योजक), निलेश वालकर (जेनेरिक मेडिकल), संग्राम साळसकर (काजू उद्योजक), विजय चव्हाण (सलून व्यावसायिक), जयप्रकाश परुळेकर (व्यापारी), सहदेव बापर्डेकर (मत्स्य उद्योजक), आर्या मयेकर (पर्यटन उद्योजिका), भाऊ सामंत (घुमडे येथील ग्रामीण पर्यटन उद्योजक), विहार मंत्री (मेणबत्ती उद्योजक), सुंदर आचरेकर (वेल्डिंग व्यावसायिक) यांचा उद्योग सन्मान पुरस्काराने सत्कार यावेळी करण्यात आला.

## मोदींसोबत योग करणार तब्बल १८० देश

२१ तोफांची सलामी दिली जाईल, तसेच पंतप्रधान आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांच्यात उच्चस्तरीय चर्चा होणार आहे.

व्हाईट हाऊसमध्ये पीएम मोदींसाठी स्टेट डिनरचे आयोजन करण्यात आले आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, राज्य डिनरमध्ये शेकडो पाहुणे - काँग्रेसचे सदस्य, मुत्सद्दी, सेलिब्रिटी उपस्थित असतील. पंतप्रधान मोदींच्या २२ जूनच्या कार्यक्रमात अमेरिकन काँग्रेसला संबोधित करण्याचाही समावेश आहे.अमेरिकन काँग्रेसच्या मागणीनुसार पंतप्रधान मोदींना हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह आणि सिनेटच्या नेत्यांनी आमंत्रित केले होते. यासोबतच पंतप्रधान मोदी अमेरिकेच्या संसदेला दुसऱ्यांदा संबोधित करणारे पहिले भारतीय पंतप्रधान ठरणार आहेत. यावेळी सभागृहाचे केविन मॅककार्थी आणि सिनेटचे चक शूमर उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या दिवशी, २३ जून रोजी उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि राज्य सचिव अँटनी ब्लिंकन यांनी त्यांना जेवणासाठी आमंत्रित केले आहे

## कितीही जनावरे एकत्र आली तरी वाघाची शिकार करु शकत नाहीत

निलंबित झालेले आशिष देशमुख यांनी जाहीर कार्यक्रमात भाजप प्रवेश केला. त्यावेळी आशिष देशमुखांची स्तुती करत देवेंद्र फडणवीस यांनी देशभरातील भाजप विरोधक तसेच महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.फडणवीस म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे जेमतेम दहा आमदार देखील उरलेले नाहीत. तरी वज्रमूठ सभेत येऊन आपलीच सभा असल्यासारखे ते हातवारे करतात. म्हणजे गर्दी इतर पक्षांची आणि हातवारे करतात उद्धव ठाकरे. त्यामुळे वज्रमुठीत आता इतके तडे गेले आहेत की, त्यांची आता वज्रमुठ होऊच शकत नाही.

**विरोधकांकडे चेहरा नाही**

ते पुढे म्हणाले, मुळात विरोधकांकडे कोणताही चेहराच नाही. नेतृत्व कुणी करावे, यावरूनच त्यांच्यामध्ये प्रचंड मतभेद आहेत. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसने डाव्यांसोबत हातमिळवणी केली आहे. त्यामुळे तृणमूल काँग्रेस नाराज झाली आहे. आपण काँग्रेससोबत जाऊ शकत नाही, असे ममता बॅनर्जींनी म्हटले आहे. इतर राज्यांतही तशीच स्थिती आहे. ते एकमेकांनाच पाडण्याचाच तयारीत आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझे म्हणणे शब्दशः घेऊ नका. मात्र, ज्याप्रमाणे जंगलात कितीही जनावरे एकत्र आली तरी ते वाघाची शिकार करू शकत नाही. त्याप्रमाणे नरेंद्र मोदी यांना कुणीही पराभूत करू शकत नाही. नरेंद्र मोदी हे राजकारणातील वाघ आहेत. जनसामान्यांच्या हितासाठी ते अविरत काम करत असतात. मन की बातच्या माध्यमातून देशातील २३ ते २४ कोटी जनतेशी ते थेट संवाद साधतात. जनतेशी त्यांची नाळ जुडलेली आहे.

**आशिष देशमुखांवर ओबीसी सेलची जबाबदारी**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आशिष देशमुखांवर आता भाजपच्या विदर्भ ओबीसी सेलची जबाबदारी असणार आहे. आशिष देशमुखांमध्ये माणसे जोडण्याची, नेतृत्व करण्याची क्षमता आहे. त्यांच्यामध्ये फक्त एकच कमतरता होती. ती म्हणजे ते आतापर्यंत भाजपसोबत नव्हते. त्यांनी आता भाजपवर श्रद्धा ठेवावी. त्यांचे पुढे काय करायचे?, हे आपण बघू.

दरम्यान, आशिष देशमुख यांनीही या कार्यक्रमात जाहीर घोषणा केली आहे की, ते पुढची विधानसभा, लोकसभा कोणतीच निवडणूक लढवणार नाही. ही घोषणा करण्यापूर्वी त्यांनी आम्हा कोणासोबतच चर्चा केली नाही. अशी घोषणा करायचा धाडस लागते. मी आशिष देशमुख यांना विश्वासाने सांगतो की, त्यांनी कोणतीही चिंता करू नये. भाजप हाच त्यांचा अंतिम पक्ष असणार आहे.

## भाजपमध्ये येताच आशिष देशमुखांचा मोठा निर्धार, फडणवीसांना दिला शब्द!

भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा होती. अखेर त्यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. 'सुबह का भुला शाम को वापस आये तो उसे भूला नही कहते' अशी प्रतिक्रिया यावेळी बोलताना आशिष देशमुख यांनी दिली आहे. झालेल्या चुकांबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, मला भाजपमध्ये पुन्हा येताना आनंद होत असल्याचंही देशमुख यांनी म्हटलं आहे.

'सुबह का भुला शाम को वापस आये तो उसे भूला नही कहते' झालेल्या चुकांबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, मला भाजपमध्ये पुन्हा येताना आनंद होत आहे. मी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना कॉल लावला तर कॉल लागत नव्हता, त्यांचे कॉल मला येत नव्हते. मी इतका वाईट नाही की काँग्रेसने मला निष्कासित केलं. मी ओबीसीची बिनशर्त माफी मागावी इतकीच मागणी केली होती.

या आधीही राफेल प्रकरणात त्यांनी माफी मागितली होती. काँग्रेस आणि गांधी परिवार ओबीसी विरोधी आहेत. मंडल कमिशनला त्यांनी विरोध केला होता. राहुल गांधी यांनी माफी मागितली असती तर आज त्यांची खासदारकी गेली नसती, असं देशमुख यांनी म्हटलं आहे.महाविकास आघाडीला टोला यावेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला आहे. फेसबुक लाईव्ह सोडलं तर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना कधीही विदर्भात दिसले नाहीत, काँग्रेस आता म्हतारी झाली आहे. जीर्ण झाली आहे. परफॉर्मन्स राहिला नाही.

या उलट भाजपमध्ये पारिवारिक वातावरण आहे. मी अडचणीत होतो तेव्हा भाजप नेत्यांनी मदत केली. काँग्रेसनं मला बाहेर काढलं ते बरं झालं त्यामुळे मी भाजपसारख्या विचारधारेच्या पक्षात येऊ शकलो असं देशमुख यांनी म्हटलं आहे.दरम्यान मी २०२४ ची कुठलीही निवडणूक लढवणार नाही, ओबीसी आणि विदर्भासाठी काम करेल. काटोलमधील काकागिरी, सावनेर मधील दादागिरी आणि विदर्भातील नानागिरी संपविण्याचं काम करेल. भाजप जो उमेदवार देईल त्याला जिंकून आणण्यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करेल, असं देशमुख यांनी म्हटले आहे.

## ८०० स्पेशल ट्रेन, ८३७ कोटी अन् १५ कोटी लोक

अपेक्षा आहे. त्यांना ये-जा करताना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची खात्री करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जावीत. दिल्ली, प्रयागराजसह तीन प्रादेशिक रेल्वेच्या नऊ गर्दीच्या स्थानकांवर विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. तिन्ही विभागीय रेल्वेमध्ये रेल्वे ओव्हर ब्रिज आणि रेल्वे अंडर ब्रिज बांधण्यासाठी आणि स्थानकांवर प्रवासी सुविधा वाढवण्यासाठी ८३७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पुढील वर्षी डिसेंबरपर्यंत संबंधित सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## मनीषा कायंदे, शिशिर शिंदेंचा ठाकरे गटाला 'जय महाराष्ट्र'

येत्या जुलै महिन्यात त्यांचा कार्यकाल संपत आहे.

काल शिवसेनेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत गेलेले व चार वर्षांपूर्वी पुन्हा शिवसेनेत परतलेले शिशिर शिंदे यांनी ठाकरे गटाच्या उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. शिशिर शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे राजीनाम्याचे पत्र पाठवले आहे. चार वर्षे आपल्याला कोणतीही जबाबदारी देण्यात आली नव्हती. नंतर आपल्याला शोभेचे पद देण्यात आले. त्यामुळे आपल्या आयुष्यातील चार वर्षे वाया गेल्याचे शिशिर शिंदे यांनी या पत्रात म्हटले आहे. चुनाभट्टीतील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक तांडेल दांपत्यानेही ठाकरे गट सोडला आहे. तेही शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, असे बोलले जाते.

**ठाकरे गटातही गटबाजी**

दरम्यान, वरळीत ठाकरे गटाचे पदाधिकाऱ्यांचे शिबीर चालू असताना तेथील आमदार सुनील शिंदे यांनी लावलेले पोस्टर्स ठाकरे गटाच्याच सचिन अहिर यांच्या समर्थकांनी फाडल्याची चर्चा जोरात होती. त्यामुळे आता ठाकरे गटात राहिलेल्या नेत्यांमध्येही गटबाजी जोर धरू लागली की काय, अशी चर्चा जोर धरू लागली आहे

## तलाठी भरती जाहीर

कंपनीची निवड केली आहे. ही परीक्षा घेण्यासाठी कंपनीकडून १७ ऑगस्ट किंवा १२ सप्टेंबर या दोन तारखांचे पर्याय दिले आहेत. यासंदर्भात सरकारला कळविण्यात आले आहे. याबाबत जमाबंदी विभागाचे अतिरिक्त आयुक्त आनंद रायत म्हणाले, 'या परीक्षेसाठी लिंक खुली करण्याची परवानगी मागितली आहे. येत्या २० जूनच्या जवळपास ही लिंक खुली होईल, अशी अपेक्षा आहे. सुमारे पाच लाख उमेदवार परीक्षेसाठी अर्ज भरण्याची शक्यता आहे. एका उमेदवाराला एकाच जिल्ह्यातून अर्ज भरता येणार आहे. साधारण गटासाठी एक हजार, तर आरक्षण गटासाठी ९०० रुपये परीक्षा शुल्क असेल.'

तलाठी पदाच्या परीक्षेचे प्रारूप तयार आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका काढणे शक्य नाही. त्यामुळे लवकरच परीक्षेच्या अर्जाच्या नोंदणीसाठी लिंक खुली करण्यात येणार आहे. त्यानंतर २१ दिवसांची मुदत परीक्षा अर्ज भरण्यासाठी देण्यात येणार आहे. परीक्षेसाठी एका जिल्ह्यातून एकाच उमेदवाराला अर्ज भरता येणार आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार, धुळे, अमरावती यासारख्या १२ जिल्ह्यांमध्ये आदिवासींचे प्राबल्य आहे. त्या लोकसंख्येच्या आधारावर तलाठ्यांच्या जागा निश्चित केल्या जाणार आहेत.

## हरिनामाच्या जयघोषात माऊलींचा पालखी सोहळा लोणंदनगरीत विसावला!

अन् ज्ञानोबा माउली तुकारामाचा अखंड जयघोष करत माउलींच्या पालखीने सातारा जिल्ह्यात प्रवेश केला. दत्त घाट निरा येथे माउलींच्या पादुकांना स्नान घातल्यानंतर पालखी सोहळ्याचे सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने भव्य स्वागत करण्यात केले. त्यानंतर पालखी लोणंद शहराकडे मार्गस्थ झाली.

डोक्यावर मोरपिसारा असलेली टोपी घातलेल्या वासुदेवांची हाळी सुरू होती. भक्तिरसात तल्लीन झालेले वारकरी आनंदाने फुगड्या खेळत होते. वारकऱ्यांचे खेळ मोबाईल, कॅमेऱ्यात टिपण्यासाठी हौशी लोकांची गर्दी दिसून येत होती. रस्त्यावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढून माउलींचे स्वागत करण्यात येत होते. फुलांचा वर्षाव करून संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे भव्य स्वागत करण्यात आले.

## उत्तरप्रदेश बिहारमध्ये उष्माघाताने १०० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू

सहन करावा लागत आहे. या राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेमुळे लोक आजारी पडत आहेत. धक्कादायक म्हणजे या दोन्ही राज्यात आतापर्यंत उष्णतेमुळे १०० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला आहे.

देशातील अनेक राज्यांमध्ये कडक्याचे ऊन आहे. उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडमध्ये उष्णतेमुळे नागरिक त्रस्त आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये आतापर्यंत १००पेक्षा अधिक जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. तर या दोन्ही राज्यांमध्ये ७२ तासांमध्ये उष्माघातामुळे ६०पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशातील एकट्या बलियामध्ये उष्णतेमुळे मृतांची संख्या ५५ वर पोहोचली आहे.दररोज १२५ ते १३० जण उपचारासाठी रुग्णालयात दाखल होत आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भ, छत्तीसगड, ओडिशा, झारखंड, आंध्र प्रदेश, बिहार, पूर्व उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तेलंगणामध्ये २० जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहणार आहे. उष्णतेच्या लाटेमुळे या राज्यातील नागरिकांना सावध राहण्याचा आणि काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील बलियामध्ये उष्णतेच्या लाटेच्या उद्रेकाबाबत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन्ही राज्यांना उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने लहान मुले, गरोदर महिला, वृद्ध आणि मजुरांना उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सल्ला दिला आहे